# ‘फिनोलेक्स, मुकुल माधव’तर्फे भात बियाण्यांचे वाटप

**कृषी विकास**

- सतत १२ वर्षे उपक्रमांचे आयोजन
- कृषी उत्पन्न वाढीस मोठा हातभार

| त. भा. प्रतिनिधी

**रत्नागिरी :** फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि मुकुल माधव फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रत्नागिरी फणसोप–कसोप परिसरातील गरजू शेतकऱ्यांना उच्च दर्जाच्या भात बियाण्यांचे वाटप करण्यात आले.

गेल्या १२ वर्षांपासून सुरू असलेल्या या उपक्रमामुळे परिसरातील शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे उपलब्ध होत असून शेती उत्पादन वाढण्यास मदत होत आहे.या उपक्रमांतर्गत कसोप, फणसोप, कुर्ली, वायंगणी आणि मागलाड या पाच गावांतील शेतकऱ्यांना भात बियाण्यांचे वितरण करण्यात आले.

संस्थेकडून विविध समाजोपयोगी व शेतीविषयक अनेक उपक्रम राबविले जात जातात. मोगरा लागवड, भाजी लागवड, तसेच विविध प्रशिक्षण देण्यात येत असल्याने शेतकरी, ग्रामस्थ, सरपंच तसेच ग्रामपंचायत सदस्यांनी फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशनचे आभार




रत्नागिरी : शेतकऱ्यांना बियाणे वाटप करताना अधिकारी व इतर मान्यवर.

मानले. हा उपक्रम शेतकऱ्यांचे कृषी उत्पन्न वाढवण्यासोबतच ग्रामीण भागातील शाश्वत विकासाला चालना देणारा ठरणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

फणसोप विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या सहकार्याने आयोजित या कार्यक्रमास पंचायत समिती सदस्या संजना साळवी, सोसायटीचे प्रतिनिधी मनोज साळवी, राजेंद्र साळवी, समीर साळवी, तुषार साळवी, माजी सरपंच गिरिराज साळवी, रामबाबू संका, सागर चिवटे, वरिष्ठ अधिकारी आशिष आठवले, सीएसआर अधिकारी शामराव निंबाळकर उपस्थित होते.